**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - 416004.**

---

**परिपत्रक क्र.- कोविमं./उमाप(इ.12वी)/आवेदनपत्र/फेब्रु./मार्च -2023/** क्रमांक 2314 **दि**17/11/2022

**विषय** :- मार्च 2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता 12 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरीतील तफावत क्षमापित करणे, आवेदनपत्र रद्द करणे इ.बाबत

**१. आवेदनपत्र रद्द करणेबाबत**

ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 75% भरत नाही व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी 50% ते 75% च्या दरम्यानची आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे अगर एका सत्रात 50% पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्यासाठी शिफारस करावयाची नाही. अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र रद्द करण्यासाठी स्पष्ट शिफारस करावी व असे प्रस्ताव विहीत तक्त्यात एकत्रितरित्या मंडळाकडे दि.5 फेब्रुवारी 2023 पर्यंत सादर करावेत.

हजेरी कमी या कारणाखेरीज अन्य कारणास्तव आवेदनपत्र रद्द केले जाणार नाहीत तसेच उपरोक्त बाबत फेरप्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

यासंदर्भात आवश्यकता भासल्यास मंडळाकडून हजेरीसंदर्भातील मुळ अभिलेखाची मागणी करण्यात येईल त्यावेळी ते सादर करणे आवश्यक राहील. तसेच दि.5 फेब्रुवारी 2023 नंतर सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाला विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणासाठी प्रति विद्यार्थी प्रशासकीय शुल्क रु 500/- आकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**2. विद्यार्थ्यांच्या हजेरीतील तफावत क्षमापित करणे.**

**अ)** उपस्थितीची गणना प्रथम सत्र कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाल्यापासून 15/10/2022 पर्यंत व दुसरे सत्र 31/01/2023 पर्यंत करण्यात येते. या कालावधीत नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरी प्रत्येक सत्रात स्वतंत्रपणे 75% भरणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 60% ते 75% दरम्यान आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरीतील तफावत क्षमापित करण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे.

**ब)** ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम व द्वितीय सत्रात स्वतंत्रपणे अथवा अपवादात्मक प्रकरणी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 50% पेक्षा जास्त परंतु 60% पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांच्या हजेरीतील तफावत क्षमापित करण्याचा अधिकार मा.अध्यक्ष, राज्य मंडळ पुणे यांना आहे. तथापि त्यासाठी 1) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार 2) विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचे आकस्मित निधन 3) अनपेक्षित कारणांमुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी / परदेशी जाणे भाग पडणे 4) नैसर्गिक आपत्ती 5) या खेरीज अन्य रास्त कारण असल्यास अशा कारणांच्या सबळ पुराव्यासह (दाखला,प्रमाणपत्र) सत्रवार हजेरीतील तफावतीची नोंद करुन प्राचार्यांच्या स्पष्ट शिफारशीसह स्वतंत्र प्रस्ताव पाठवावेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वतंत्र परिशिष्ठ द्यावे. अशा प्रस्तावांवर मा.अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांनी दिलेला निर्णय अंतिम व बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर**

**प्रति, प्राचार्य,**
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर
प्रत- माहितीस्तव शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद सातारा/सांगली/कोल्हापूर

Panwalkar/Circular